॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻

जो वेळ वाया घालवतो त्याच्याजवळ गमवायलाही काही उरत नाही.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट

'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर

आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.

आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप

आता बातमीबरोबरच बरेच काही

मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक १३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# अतिरेकी हल्ल्यात २७ पर्यटक ठार

## काश्मिरात पर्यटकांवर भ्याड हल्ला । घटनास्थळी रक्ताचा सडा

**● पहलगाम । वीरभूमी-**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम जिल्ह्यात मंगळवारी दहशतवाद्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात २७ पर्यटकांचा मृत्यू झाला तर २ डझनहून अधिक पर्यटक जखमी झाले आहेत. ७ ते ८ दहशतवाद्यांनी पर्यटकांना टार्गेट करत थेट गोळीबार केला. त्यानंतर दहशतवाद्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ या दहशतवादी संघटनेने स्वीकारली आहे. हल्लेखोर पोलिसांच्या गणवेशात आले होते. तसेच त्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या अशी प्रत्यक्षदर्शींची माहिती आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तातडीने जम्मू-काश्मीरला रवाना झाले असून, हल्लेखोरांना सोडणार नाही, असा इशारा दिला आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने आलेले होते. यामध्ये गुजरात, तामिळनाडू, उडिसा, महाराष्ट्रातील पर्यटकांचाही समावेश होता. आज पोलिसांच्या वेशात तिथे अतिरेकीआले आणि त्यांनी थेट जात विचारून पर्यटकांवर बेछूट गोळीबार सुरू केला. या भ्याड हल्ल्यात तब्बल २७ पर्यटक मृत्युमुखी पडले असून, ८ ते १० जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन विदेशी नागरिक आणि दोन महाराष्ट्रीय आहेत. दरम्यान, जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. घटनास्थळी अक्षरश: रक्ताचा सडा पडला होता. या घटनेने देश हादरला आहे.



दहशतवाद्यांनी एका मागून एक पर्यटकांना टार्गेट केले. २००६ नंतरचा जम्मू-काश्मीरमधील हा सर्वात मोठा हल्ला असल्याचे सांगितले जाते. अर्थात गेल्या दोन दशकांत काश्मीरमधील पर्यटकांवर झालेला हा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला आहे. हा भ्याड हल्ला झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तातडीने जम्मू-काश्मीरला रवाना झाले आहेत. या हल्ल्यात सहभागी असणा-यांना सोडले जाणार नाही, असे अमित शहांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील या हल्ल्याचा निषेध करत मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. या हल्ल्यानंतर जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी संवेदना व्यक्त करत या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला.

या हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. ज्या ठिकाणी दहशतवादी हल्ला झाला, त्या भागात सैनिक तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान, या हल्ल्यात जखमींवर उपचार सुरू असून, अनेकांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### महाराष्ट्रातील तिघा भाविकांचा मृत्यू

■ दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील दोन पर्यटकांचा मृत्यू झाला. यात दिलीप डिसले आणि डोंबिवलीचे अतुल मोने आणि संजय मोने यांचा समावेश आहे. अतुल मोने हे डोंबिवलीतील रहिवासी आहेत. मोने हे पत्नी आणि मुलीसह फिरण्यासाठी गेले होते. मोने यांच्यासोबत डोंबिवलीतील हेमंत जोशी आणि संजय लेले हेही कुटुंबासह गेले होते. यासोबत पुण्यातील जगदाळे पती-पत्नी आणि गणबोटे दाम्पत्यही आहे. यात संतोष जगदाळे, कौस्तुभ गणबोटे जखमी झाले आहेत.

## SPOT NEWS

### यूपीएससीत पुण्याचा अर्चित डोंगरे राज्यात पहिला

**● मुंबई** – केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या यूपीएससी परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून शक्ती दुबे या महिला उमेदवाराने देशात पहिला क्रमांक पटकावला तर हर्षिता गोयल देशात दुसरी आली असून पुण्याच्या अर्चित डोंगरेने देशात तिसरा आणि महाराष्ट्रात पहिला आला आहे. यंदाही यूपीएससी परीक्षेत महाराष्ट्राने आपली पताका फडकावली असून पुणे, ठाण्यासह विविध जिल्ह्यातील उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये मुलींनीही दैदिप्यमान कामगिरी बजावली आहे. यूपीएससी परीक्षा २०२४ चा निकाल आज जाहीर करण्यात आला असून यूपीएससी डॉट जीओव्ही डॉट ईन या वेबसाईटवर हा निकाल पाहता येणार आहे. यंदाच्या परीक्षेत शक्ती दुबे या उमेदवाराने देशात प्रथम क्रमांक पटकावला असून एकूण १००९ उत्तीर्ण उमेदवारांची यादी प्रकाशित करण्यात आली आहे. यामध्ये ३३५ सर्वसाधारण, १०९ ईडब्ल्यएस, ३१८ ओबीसी, १६० एससी, ८७ एसटी प्रवर्गातील उमेदवार आहेत. या उमेदवारांच्या १७ एप्रिल २०२५ पर्यंत मुलाखती घेण्यात आल्या होत्या. ७ जानेवारी २०२५ पासून मुलाखतीच्या राऊंडला सुरुवात झाली होती. २०२४ च्या परीक्षेत यूपीएससीने आयएएस, आयपीएससह एकूण ११३२ पदांसाठी भरती काढली होती.

### सोन्याच्या किंमतीत १५०० रुपयांची वाढ

**● नाशिक** – गेल्या काही दिवसांमध्ये सोन्या-चांदीचे दर आगामी काळात कमी होतील असा तज्ज्ञांचा अंदाज खोटा ठरला आहे. सोन्या-चांदीच्या भावात वाढ सुरूच असून काल २१ एप्रिल २०२५ रोजी सोन्याने प्रतितोळा लाखाचा टप्पा गाठला होता. पुन्हा २२ एप्रिल रोजी सोन्याच्या दरात रात्रीतून पुन्हा १५०० रुपयांची मोठी वाढ झाली आहे. सोन्याचे दर ९९०००चा टप्पा पार करत जीएसटीसह हेच सोन्याचे दर १०२००० रुपये इतके झाले आहेत. दरम्यान, सोन्या-चांदीच्या भावात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याचे चित्र आहे. जळगावात सोमवारी सोन्याच्या भावात सकाळी ६०० व संध्याकाळी पुन्हा ७०० रुपयांची वाढ झाली होती. यामुळे सोने ९७.३०० रुपये प्रति तोळ्यावर पोहोचले होते. तर जीएसटीसह १ लाख २१९ रुपये प्रति तोळा झाले आहेत.

### वार्षिक यात्रे दिवशीच चांडगावावर शोककळा; मायलेकाचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू





**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

श्रीगोंदा तालुक्यातील चांडगाव येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांची मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी यात्रा होती. यात्रेकरिता घरातील स्वच्छता करण्यासाठी राजेंद्र हिरामण लोंढे यांनी घरातील आवराआवर करुन घर धुत असताना त्यांना विजेचा धक्का बसला. हे पाहून मुलाला वाचवण्यासाठी आई सखुबाई हिरामण लोंढे या धावुन आल्या मात्र त्यांनाही विजेचा धक्का बसला. दोघाही मायलेकांना ताबडतोब श्रीगोंदा येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले मात्र यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हि घटना सकाळी आठच्या सुमारास घडली.

गावाची यात्रा असल्याने आणि घडलेल्या या दुर्दैवी घटनेने गावावर शोककळा पसरली आहे. यात्रेच्या दिवशीच अशी दुर्दैवी घटना घडल्याने तालुक्यांत सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या मागे वडील, भाऊ, पत्नी, भावजय, चार बहिणी व दोन मुले असा परिवार आहे.

# निळवंडे कालव्यातून विसर्ग सुरू

**● अकोले । वीरभूमी-**

निळवंडेच्या लाभ क्षेत्रासाठी आज निळवंडे धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे डाव्या व उजव्या कालव्यातून एकूण ४५० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे.

निळवंडे धरणातून भंडारदरा धरणाच्या लाभ क्षेत्रासाठी यापूर्वीच प्रवरा नदी पात्रात पाणी सोडण्यात आलेले आहे दि.२० रोजी सकाळी ११ वाजता निळवंडे च्या लाभ क्षेत्रासाठी पाणी सोडण्यास सुरुवात झाली. सकाळी उजव्या कालव्यातून १०० क्यूसेक तर डाव्या कालव्याचतून १०० क्युसेक असा विसर्ग सुरू करण्यात आला.दुपारी या विसर्गात वाढ करण्यात आली. सायंकाळी निळवंडे च्या डाव्या कालव्यातून २५० क्युसेक तर उजव्या कालव्यातून २०० क्युसेक विसर्ग सुरू होता.सायंकाळीं निळवंडे धरणाचा पाणीसाठा २६५९ द ल घ फू होता.



भंडारदरा धरणाच्या लाभ क्षेत्रासाठी निळवंडे धरणातून १५०० कयुसेक पाणी प्रवरा नदीत सोडण्यात येत आहे. त्यातील ८००क्युसेक वीज केंद्रातून तर ७०० क्युसेक सिंचन विमोचका मधुन सोडण्यात येत आहे. अशा प्रकारे निळवंडे धरणातून एकूण १९५१ क्युसेक विसर्ग सायंकाळी सुरु होता. निळवंडे धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी भंडारदरा धरणातून पाणी सोडण्यात येत आहे. सायंकाळीं भंडारदरा धरणाच्या अंब्रेला फॉल मधुन ४९८ क्युसेक् तर वीज निर्मिती साठी ८५० क्युसेक असा एकूण १३४८ क्युसेक विसर्ग प्रवरा नदी पात्रात सुरू होता. सायंकाळीं निळवंडे धरणाचा पाणी साठा ५८७७ दलघफू होता. निळवंडेच्या लाभ क्षेत्रासाठीचे हे आवर्तन महिना भरा पेक्षा अधिक काळ सुरू राहण्याची शक्यता आहे.

# शासनाच्या दडपशाही विरोधात जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने

## जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी; विविध पक्ष-संघटनांचे आंदोलन

**● नगर । वीरभूमी –**

महाराष्ट्र सरकारने विधानसभेत मांडलेल्या महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक क्रमांक ३३ विरोधात आयटक, भाकप आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समितीच्या वतीने मंगळवारी (दि. २२ एप्रिल) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. हे विधेयक नक्षलवाद्यांच्या विरोधात नसून, संविधानाच्या चौकटीत काम करणाऱ्या संघटना व कार्यकर्त्यांवर दडपशाही करण्यासाठी असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

या आंदोलनात विविध सामाजिक, कामगार व नागरी हक्कासाठी लढणाऱ्या संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या वेळी जोरदार घोषणाबाजी करत विधेयक त्वरित रद्द करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात भाकपचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते, आयटकचे राज्य उपाध्यक्ष ॲड. कॉ. सुधीर टोकेकर, अशोक सब्बन, अर्शद शेख, कॉ. सतिश पवार, सुभाष शिंदे, कॉ. बबन सालके, कॉ. संतोष खोडदे, कॉ. बेबी राऊत, आप्पासाहेब वाबळे, कॉ. रामदास वागस्कर, वीरबहादूर प्रजापती, कॉ. सुभाष कडलग, नलिनी गायकवाड, दीपक पापडेजा, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, रवी सातपुते, सगुणा श्रीमल, कॉ. मुनोत, अविनाश साठे, कॉ. सोमनाथ केंदले, विलास मिसाळ, संदीप सकट, कॉ. उमाप आदींसह भ्रष्टाचार निर्मूलन, पीस फाउंडेशन, आम आदमी पार्टी, विडी कामगार संघटना, एमआयडीसी कामगार संघटना व अवतार मेहेरबाबा ट्रस्ट आदी विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकाचे उद्दिष्ट शहरी नक्षलवादाचा बंदोबस्त असे सांगितले असले तरी, विधेयकात नक्षलवाद किंवा शहरी नक्षलवाद हे शब्दच नाहीत. बेकायदेशीर कृत्य आणि ते करणाऱ्या बेकायदेशीर संघटना असा अत्यंत अस्पष्ट व मोघम अशी व्याख्या केलेली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांपासून ते संविधानिक अधिकारांसाठी लढणाऱ्या संघटनांपर्यंत कोणालाही लक्ष्य करता येईल, अशी भीती आंदोलकांनी व्यक्त केली. सरकार व सरकारी यंत्रणांवर टीका करणे, धोरणांची चिकित्सा करणे अथवा आंदोलन करणे या लोकशाहीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच हा कायदा गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा म्हणजे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवरच घाला असल्याचा ठाम आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.




हे विधेयक संपूर्णपणे मागे घेण्याची आणि लोकशाहीचे मूल्य जपण्याची मागणी सर्व संघटनांनी एकमुखाने केली. महाराष्ट्रात इतर जिल्ह्यांमध्येही अशाच प्रकारची आंदोलने होत असून, या कायद्याविरोधात राज्यव्यापी संघर्ष छेडण्यात आले आहे.

# SPOT NEWS

## संत श्री शेख महंमद महाराजांच्या मंदिराचा प्रश्न कायदेशीर चौकटीत सोडवू : श्रीकुमार चिंचकर

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

संत श्री शेख महंमद महाराज यांच्या जीर्णोद्धारासाठी सध्या ग्रामस्थ्यांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरु आहे. याबाबत श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी हा प्रश्न लवकरच कायदेशीर मार्गाने निकाली काढणार असल्याचे सांगत प्रसिद्धी पत्रकाद्वारे श्रीगोंदे वासियांना शांतता राखत कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. प्रसिद्धीपत्रकात श्री. चिंचकर यांनी म्हटले आहे की श्रीगोंदा शहर व तालुक्याचे ग्रामदैवत सदगरु श्री संत शेख महमंद महाराज मंदिराचे तथाकथित वंशज अमीन शेख यांचे ट्रस्ट व यात्रा उत्सव कमिटी यार्चेतील वादाच्या अनुषगांने यांचेकडुन अडथळा निर्माण करणे व रुढी परंपरेने महाराजांचा यात्रा व धार्मीक विधी करत असणा-या सदगुरु श्री संत शेख महमंद महाराज यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचेमधील वादग्रस्त बाबी बद्दल गुरुवार दि. १७ एप्रिल २०२५ पासुन जे श्रीगोंदा तहसिल कार्यालयाच्या आवारात जे आंदोलन सुरु झाले आहे त्या संदर्भात उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा-पारनेर उपविभाग अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली दि. १६ एप्रिल रोजी दुपारी १.०० वा. तहसिल कार्यालय श्रीगोंदा येथे मा. आमदार विक्रम पाचपुते यांच्या उपस्थितितीत आंदोलनाशी संबधीत व श्रीगोंदा शहरातील सामाजिक कार्यकर्ते यांची बैठक आयोजीत केली होती. या बैठकीत कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही तसेच श्रीगोंदा शहरात शांतता प्रस्थापित रहावी याबाबत सदर बैठकीत आवाहान करण्यात आले होते. या विषयावर पुन्हा उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा-पारनेर उपविभाग अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली तसेच तहसिलदार श्रीगोंदा, पोलीस निरीक्षक श्रीगोंदा, मुख्याधिकारी नगरपरीषद श्रीगोंदा व इतर शासकीय अधिकारी दि. २२ एप्रिल रोजी स. ११ वा. तहसिल कार्यालय श्रीगोंदा येथे आदोलनाशी संबधीत व श्रीगोंदा शहरातील शिवप्रतिष्ठाण, बजरंग दल, विश्व हिंदू परीषद यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत आंदोलनाबाबत चर्चा झाली. या प्रश्नावर योग्य तो मार्ग काढला जाईल तरी सर्व नागरिकांनी याबाबत शांतता राखावी व कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याची सर्वांनी काळजी घ्यावी असे अवाहान या बैठकीत करण्यात आले. तरी उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा - पारनेर या नात्याने श्रीगोंदा शहरातील लोकांना असे अवाहान करतो की, या विषयावर कायदेशिर चौकटीत मार्ग काढला जाईल तो पर्यत कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये व श्रीगोंदा शहरात शांतता ठेवावी व कोणीही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार याची काळजी घ्यावी, असे आवाहन श्रीकुमार चिंचकर यांनी नागरिकांना केले आहे.

## जी. डी. खानदेशे यांना स्व. माधवराव मुळे जीवन गौरव पुरस्कार प्रदान

**● अकोले । वीरभूमी-**

स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवन गौरव पुरस्कार जी.डी. खानदेशे यांना प्रदान करण्यात आला. खानदेशे यांच्या वतीने त्यांचा मुलगा अभय खानदेशे यांनी हा सन्मान स्वीकारला. यावेळी मोरे बोलत होते. लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जे राव निमसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश मुळे, उपाध्यक्ष दत्तापाटील नारळे, सचिव डॉ. मच्छिंद्रनाथ तांबे, प्रा. लालचंद हराळ, डॉ. महेश मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# निळवंडेचे पाणी कोपरगावच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यातील अडचणी दूर

### आ. आशुतोष काळेंच्या प्रयत्नातून बोडखेवाडी पॉईंटपासून चर खोदण्याच्या कामास प्रारंभ

**● कोपरगाव । वीरभूमी-**

कोपरगाव तालुक्याच्या जिरायती भागातील गावात निळवंडे कालव्याचे पाणी पोहोचविण्यात येणाऱ्या अडचणी आ.आशुतोष काळेंच्या प्रयत्नातून दूर झाल्या आहेत. निळवंडे कालव्याचे पाणी जिरायती गावात पोहोचविण्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या निळवंडे कालव्याच्या बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याच्या कामास आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला आहे. त्यामुळे जिरायती परिसरातील रांजणगाव देशमुख, अंजनापूर, बहादरपूर आदी गावातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.



चालू वर्षी उन्हाळा अधिकच तीव्र स्वरूपाचा असल्यामुळे नागरीकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये यासाठी रांजणगाव देशमुख उजनी उपसा जलसिंचन योजनेसाठी स्वत: पदरमोड करणाऱ्या आ.आशुतोष काळे यांनी शासनाच्या वतीने ज्या काही उपाय योजना कराव्या लागतील त्या उपाय योजना करण्याच्या सूचना प्रशासनाला दिलेल्या आहेत. त्याचबरोबर नागरीकांच्या देखील पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत ज्या काही मागण्या असतील त्या मागण्या देखील पूर्ण करण्यात आ.आशुतोष काळे तत्पर असल्यामुळे शेतकऱ्यांनी चर खोदून देण्याची मागणी करताच त्या मागणीची त्वरित दखल घेवून त्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना सदर चर खोदून देण्याच्या सुचना दिल्या होत्या.

त्या सूचनेनुसार मंगळवार (द.२२) रोजी प्रत्यक्षात निळवंडे कालव्याच्या बोडखेवाडी पॉइंटपासून चर खोदण्याच्या कामास प्रारंभ देखील करण्यात आला आहे. मागील अनेक दशकापासून जिरायती गावातील शेतकऱ्यांचा प्रश्न आ. आशुतोष काळे यांच्यामुळे मार्गी लागला आहे. त्यामुळे रांजणगाव देशमुख-अंजनापूर परिसरातील पाझर तलाव व बंधारे भरुन देण्यासाठी मोठी मदत होवून नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे. त्याबद्दल रांजणगाव देशमुख, अंजनापूर, बहादरपूर आदी गावातील नागरिकांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

यावेळी आ. आशुतोष काळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले की, आपल्या परिसराच्या अडचणी सोडविण्यासाठी मी कटिबद्ध असून ते माझे कर्तव्य आहे. हे पाणी आपल्यासाठीच आहे त्यामुळे हे पाणी पाझर तलावापर्यंत लवकरात लवकर कसे पोहोचेल व आपल्या अडचणी कायमच्या दूर कशा होतील यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच चर खोदण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशा सूचना उपस्थित निळवंडे कालव्याच्या अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या. यावेळी रांजणगाव देशमुख, अंजनापूर परिसरातील पदाधिकारी, ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

## श्रीगोंदा तालुक्यातील भाजपा मंडल अध्यक्षांच्या निवडी जाहीर





**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

श्रीगोंदा तालुक्यात भाजपा अंतर्गत श्रीगोंदा पूर्व मंडल (कोळगाव, मांडवगण, आढळगाव, जि.प.गट) श्रीगोंदा पश्चिम मंडल (काष्टी, बेलवंडी, येळपणे, जि.प.गट) व श्रीगोंदा मध्य मंडल (श्रीगोंदा शहर) अशी मंडल रचना करण्यात आली असून श्रीगोंदा पूर्व मंडलाच्या मंडल अध्यक्षपदी डॉ. विक्रम भोसले (कसरे), श्रीगोंदा पश्चिम मंडलाच्या मंडलअध्यक्षपदी अजित काकडे तर श्रीगोंदा मध्य मंडलाच्या अध्यक्षपदी धनराज कोथिंबीरे यांची भाजपा प्रदेश पातळीवरून अधिकृत निवड जाहीर करण्यात आली आहे. अशी माहिती तालुकाध्यक्ष संदिप नागवडे यांनी दिली.

मंडल अध्यक्ष निवडण्यासाठी पक्षाकडून निरीक्षक नेमण्यात आले होते. त्यानुसार दि. ७ एप्रिल रोजी निरीक्षकांनी सर्व इच्छुकांच्या मुलाखती घेऊन व कार्यकर्ते पदाधिकारी यांचे मत लक्षात घेऊन मंडल निहाय प्रत्येकी ३ नावांची यादी तयार करून शिफारस प्रदेशाकडे पाठविण्यात आली होती. त्यानुसार वरीलप्रमाणे नावांची घोषणा करण्यात आली आहे. निवड झालेल्या सर्वांचेच मा.मंत्री बबनरावजी पाचपुते, आ. विक्रम पाचपुते, डॉ. प्रतिभाताई पाचपुते, अ‍ॅड. प्रतापसिंह पाचपुते यांसह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निवडीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वा. माऊली संपर्क कार्यालय, श्रीगोंदा येथे जाहिर सत्कार आयोजित करण्यात आला आहे. तसेच उर्वरित पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्ते यांनाही भाजपा कार्यकारीणी मध्ये व तालुका व जिल्हा शासकिय समित्यांमध्ये स्थान देण्यात येणार असल्याचेही संदिप नागवडे म्हणाले.

## अकोले तालुक्यात भाजपचे पाच मंडल अध्यक्ष जाहीर

**● अकोले । वीरभूमी-**







अकोले अनुसूचित जमाती विधानसभा मतदारसंघातून प्रवरा, मुळा, आढळा खोऱ्यासह आदिवासी बहुल दुर्गम ग्रामीण भागांसह संगमनेर तालुक्यातील पठार भागाच्या भूरचनेनुसार यापुढे भारतीय जनता पक्षाने नव्याने मंडलनिहाय पाच अध्यक्षांच्या निवडी रविवारी जाहीर केल्या.

भाजपाचे अकोले तालुका निरिक्षक नितिन कापसे यांनी अकोल्यात भाजप संपर्क कार्यालयात भाजपाचे तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेऊन या निवडी जाहीर केल्या.

अकोले तालुका निरीक्षक नितीन कापसे यांनी अधिकृत नियुक्तीपत्र सबंधित सर्व ०५ मंडल अध्यक्षांना प्रदान करून त्यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब केले.

अकोले विधानसभा मतदारसंघातून २०२९ च्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंघातून मताधिक्य मिळवून भाजपचे नेते वैभवराव पिचड यांना निवडून आणण्याची व्यूहरचना यानिमित्त आखण्यात येत आहे. अकोले तालुक्याला पाच अध्यक्ष निवडल्याने भारतीय जनता पक्षाचे ध्येय धोरणे सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. तसेच ३०७ बूथ ची जबाबदारी ही पाच अध्यक्ष यांच्यावर सोपविण्यात येणार असल्याने प्रत्येकी ६० ते ६५ बूथांची जबाबदारी देण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनसंपर्क वाढण्यास मदत होणार आहे.

तालुक्यातील आदिवासी बहुल दुर्गम भाग, संगमनेर तालुक्यातील पठार भागांसह बिगर आदिवासी तीन खोऱ्यातूनच पाच अध्यक्षांना नियुक्त करण्यात आले.

यात प्रमुख अकोले मंडलाचे अध्यक्षपदी राहुल देशमुख, देवठाण- समशेरपूर मंडल अध्यक्षपदी वाल्मिक नवले, कोतूळ मंडल अध्यक्षपदी बाळासाहेब सावंत, राजूर मंडल अध्यक्षपदी दत्तू ढगे व संगमनेर पठार मंडल अध्यक्षपदी संतोष शेळके यांची नियुक्ती करण्यात आल्याचे नितिन कापसे यांनी जाहीर केले.

या अध्यक्ष निवडीबद्दल भाजप अनुसूचित जन जाती मोर्चा नवी दिल्लीचे राष्ट्रीय मंत्री मा. आ. वैभवराव पिचड, जिल्हा सरचिटणीस सीताराम भांगरे, मावळते तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनिल दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, अमृतसागर चे व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, तालुका सरचिटणीस मच्छीन्द्र मंडलिक, धनंजय संत, भरत घाणे, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, अरुण शेळके, सुनील सारोक्ते, अब्दुल इनामदार, खंडू बाबा वाकचौरे, अमृतसागरचे संचालक आनंदराव वाकचौरे, रमेशराव राक्षे, भाऊसाहेब वाकचौरे, सोमदास पवार, दिनेश शहा, राजेंद्र डावरे, अशोक आवारी, सुशांत वाकचौरे, दगडू हासे, प्रतीक वाकचौरे, महेश काळे, विवेक चौधरी आदीसह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून ‘अर्थ डे’ निमित्त पुन्हा शाश्वत पर्यावरणासाठी आपली वचनबद्धता जाहीर

### टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या मॅनुफॅक्चरिंग विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि संचालक श्री बी. पद्मनाभ यांचे सर्वस्वी श्रेय

**● पुणे । वीरभूमी-**

‘अर्थ डे’ निमित्त यावर्षी संपूर्ण जग ‘अवर पॉवर, अवर प्लॅनेट’ या थीमनुसार एकत्रित येत असताना आम्हाला देखील या गोष्टीची जाणीव आहे की आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यापैकी प्रत्येकावर आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या (टीकेएम) मूलभूत मूल्यांमध्येच ही जबाबदारी समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे आम्ही सातत्याने नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान तयार करत आहोत आणि वेगवेगळ्या प्रकारची इलेक्ट्रिफाईड वेहिकल टेक्नॉलॉजी (XEVs*) विकसित करत आहोत, ज्यामध्ये पर्यायी इंधनावर चालणाऱ्या पॉवरट्रेन्सचा (वाहनांचा) समावेश आहे. या प्रयत्नांत आम्ही अनेक मार्गांनी काम करत आहोत, त्याचबरोबर अक्षय ऊर्जे चा (रिनिवेबल एनर्जी) वापर करून सामुहिक शाश्वत उपक्रमांचे नेतृत्व करत आहोत जेणेकरून पर्यावरणदृष्ट्या सक्षम जग घडवता येईल. जागतिक पातळीवर २०१५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या टोयोटाच्या ‘इन्व्होर्मेन्टल चॅलेंज २०५०’ (चॅलेंज १-६) शी सुसंगत राहून, आम्ही टीकेएममध्ये उत्पादनांच्या पलीकडे जाऊन मॅनुफॅक्चरिंग प्रक्रियेत आणि संपूर्ण व्हॅल्यू चेनमध्ये शाश्वत पद्धतींचा समावेश करत कार्बन-न्यूट्रल बनण्याकडे आमचा प्रवास वेगाने पुढे नेत आहोत.

या सहा इन्व्होर्मेन्टल चॅलेंजमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे: **चॅलेंज १ :** न्यू वेहिकल झेरो CO2 एमिशन्स चॅलेंज (ग्रीन मोबिलिटी), **चॅलेंज २ :** लाईफसायकल झिरो CO2 एमिशन्स चॅलेंज (ग्रीन सप्लाय चेन, इको डीलरशिप अँड ग्रीन लॉजिस्टिक्स), **चॅलेंज ३ :** प्लांट झिरो CO2 एमिशन्स चॅलेंज (रिनीवेबल एनर्जी सप्लाय, विजेचा कमी आणि कार्यक्षम वापर), **चॅलेंज ४ :** पाण्याचा वापर कमी करणे आणि योग्य पद्धतीने वापर करणे (4RA रिड्यूस, रियूज, रिसायकल अँड रिचार्ज), **चॅलेंज ५ :** पुनर्वापरावर आधारित समाज आणि प्रणाली निर्माण करणे (संसाधनांचा चांगल्या प्रकारे वापर, वेस्ट टू व्हॅल्यू मॅनेजमेंट-कचरा व्यवस्थापन आणि लाईफ झालेल्या वेहिकलची योग्य विल्हेवाट), **चॅलेंज ६ :** निसर्गासोबत सुसंवाद असणारा समाज निर्माण करणे (टोयोटा ग्रीन व्हेव अँड टुडे फॉर टुमारो प्रोजेक्ट्स - वृक्षारोपण मोहिमा, पर्यावरण शिक्षण केंद्र - एकोझोन)

वरीलपैकी १ ते ३ चॅलेंज हे आमच्या टेक्नॉलॉजी ड्रिव्हन प्रोजेक्ट आणि ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग ऑपरेशन्सवर आधारित आहे, ज्यामुळे कार्बन उत्सर्जन जवळजवळ शून्यावर आणण्याचा प्रयत्न केला जातो. आम्ही वाहनाच्या संपूर्ण निर्मिती प्रक्रियेत - कच्च्या मालाच्या निर्मितीपासून ते वाहतुकीपर्यंत, वाहनाच्या जोडणीपासून उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या ऊर्जेपर्यंत आणि अक्षय ऊर्जेच्या वापरापर्यंत - कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर भर देतो. याशिवाय चॅलेंज ४ ते ६ अंतर्गत आम्ही पाण्याचा वापर कमी करणे, पुनर्वापरावर आधारित समाज उभारणे आणि निसर्गासोबत सुसंवाद राखणारा समाज घडवण्यावर काम करत आहोत. आज आमचे संपूर्ण उत्पादन १००% रिनीवेबल एनर्जी ग्रीडवर चालते; आमच्याकडील ९६% पेक्षा अधिक कचऱ्याचा पुनर्वापर करण्यात येतो आणि आमच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या पाण्यापैकी ८९.३% पाणी पावसाचे साठवलेले पाणी असून त्यातही पुनर्वापर पद्धतीचा समावेश आहे. यामुळे आम्ही झिरो कार्बन, झिरो लिक्विड डिस्चार्ज आणि झिरो वेस्ट टू लँडफिल (कार्बन उत्सर्जन नाही, सांडपाणी नाही, डंपिंगमध्ये कचरा नाही) यांचे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने ठोस पावले उचलत आहोत.

टोयोटा ग्रीन व्हेव प्रकल्पाअंतर्गत, मियावाकी पद्धतीने आतापर्यंत ३,२८,००० पेक्षा जास्त झाडे लावण्यात आली आहेत. यामुळे परिसंस्था पुन्हा निर्माण झाली असून ७९० हून अधिक स्थानिक झाडांच्या जाती आणि ४०० हून अधिक प्राणी व पक्ष्यांच्या जाती आमच्या कारखान्याच्या परिसरात नांदत आहेत. गेल्या वर्षात आमच्या परिसराबाहेर ८,००० हून अधिक झाडे लावण्यात आली, जेणेकरून आपला हरित परिसर आणखी वाढवता येईल. एकोझोन हे आमचे २५ एकर जागेतील अनुभवाधारित पर्यावरण शिक्षण केंद्र असून त्यामार्फत ४०,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना व इतर सहभागी सदस्यांना पर्यावरणाविषयी माहिती आणि प्रोत्साहन मिळाले आहे, सकारात्मक बदल घडून आला आहे ज्यातून पर्यावरण संरक्षक घडत आहेत.





२०३५ पर्यंत आम्ही ‘कार्बन-न्यूट्रल मॅन्युफॅक्चरिंग प्रक्रिया’ पूर्णपणे लागू करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी आम्ही ऊर्जेचा कार्यक्षम वापर, शाश्वत साहित्याचा वापर, पर्यावरणीय नियमांचे पालन आणि क्लीनर टेक्नॉलॉजीचा वापर या गोष्टींवर भर देत आहोत - हे सर्व एकत्रितपणे पर्यावरणावर होणारा हानिकारक परिणाम कमी करत आहेत. या सर्व उपक्रमांव्यतिरिक्त, आम्ही आमचे चांगले पर्यावरणीय उपाय आमच्या पुरवठादारांशी, डीलर्सशी, लॉजिस्टिक्स भागीदारांशी आणि समाजातील सदस्यांशी शेअर करत आहोत जेणेकरून आमच्या कारखान्याबाहेरही पर्यावरणावर चांगला प्रभाव पडावा. भारत ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असताना, क्लीन मोबिलिटी सोल्युशन देण्याप्रती ऑटोमोटिव्ह इंडस्ट्रीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. पुढील काळात आम्ही अशी चळवळ उभी करण्याचे ध्येय बाळगतो जिथे प्रत्येक प्रयत्नाला अर्थ असेल, प्रत्येक व्यक्तीचा आवाज महत्त्वाचा असेल आणि प्रत्येक कृती एक स्वच्छ, निरोगी आणि शाश्वत पृथ्वी घडवण्यासाठी हातभार लावेल.

XEVs मध्ये स्ट्राँग हायब्रीड इलेक्ट्रिक वेहिकल (SHEVs), प्लग इन हायब्रीड इलेक्टिक वेहिकल (PHEVs),बॅटरी इलेक्ट्रिक वेहिकल (BEVs), फ्युएल सेल इलेक्ट्रिक वेहिकल (FCEVs), इलेक्ट्रिफाईड फ्लेक्स-फ्युएल वेहिकल (EFFV) यांचा समावेश होतो.

**रेफरन्स लिंक –** टीकेएम सस्टेनेबिलिटी रिपोर्ट २०२४


# निळवंडे धरणाची उपसा यंत्रणा कार्यान्वित

## उच्चस्तरीय पाईप कालव्यातून दुष्काळी गावांना पाणी पोहोचले

● **अकोले । वीरभूमी–**

निळवंडेची उपसा यंत्रणा कार्यान्वित झाल्यामुळे धरणातील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात कमी झाली असतानाही उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी वाहू लागले. कडक उन्हाळ्यात अनेक गावांच्या शिवारात निळवंडेचे पाणी पोहोचले. उन्हाळ्यात पिके होरपळत असताना मिळालेल्या या पाण्यामुळे तेथील माणसांना दिलासा मिळाला आहे. केवळ अकोले तालुक्यासाठी असणाऱ्या निळवंडे धरणाच्या उच्चस्तरीय पाईप कालव्यांचा लाभ तालुक्यातील २ हजार ३२८ हेक्टर क्षेत्रास होतो. डाव्या उचस्तरीय कालव्याची लांबी २०.६८ किमी, त्याचे लाभक्षेत्र ८७१ हेक्टर तर उजव्या उच्चस्तरीय कालव्याची लांबी १९.३७ किमी व लाभक्षेत्र १ हजार ४५७ हेक्टर आहे. निळवंडेचे मुख्य कालवे ६१० मिटर तलांकावरून सुरू होतात तर उचस्तरीय पाईप कालवे तलांक ६२७.४० मीटरवरून सुरू होतात. निळवंडे जलाशयाची पूर्ण संचय पातळी तलांक ६४८.१५ मी. आहे. उचस्तरीय पाईप कालवा हा तलांक ६३० मी ते ६४८ मी. या गुरुत्वीय दबावाने संकल्पित करण्यात आलेला आहे. म्हणजेच धरणातील पाणीपातळी जेव्हा तलांक ६३० मी. ते ६४८.१५ मी. दरम्यान असते तेव्हाच या उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी देता येते. पाणीपातळी तलांक ६३० मी. पेक्षा कमी झाली की धरणात पाणी असूनही या कालव्याद्वारे पाणी देता येत नाही.

धरणातील पाणीपातळी तलांक ६३० मी. पेक्षाही कमी झाली तरी उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी देता यावे यासाठी उच्चस्तरीय कालवे प्रणालीकरिता उपसा यंत्रणेची उभारणी करण्यात आली आहे. यासाठी निळवंडे जलाशयातून पाणी उपसा केला जातो. जलाशयात तलांक ६१४ मी. येथून १९५ अश्वशक्तीच्या दोन पंपांद्वारे हा पाणी उपसा होतो. ५५० मिमी आकाराच्या पाईपद्वारे हे पाणी वितरण कुंडात जमा होते. या ठिकाणी पाणीपातळी तलांक ६४२ मी. ठेवली जाते. त्या मुळे उचस्तरीय पाईप कालव्यातून पाणीपुरवठा करणे शक्य होते.



उच्चस्तरीय कालव्यांसाठीच्या या उपसा योजनेची चाचणी घेतल्यानंतर प्रथम डाव्या उचस्तरीय पाईप कालव्यातून पाणी सोडण्यात आले तर सध्या उजव्या उच्चस्तरीय कालव्यातून पाणी सोडण्यात येत आहे. ही उपसा योजना कार्यन्वित झाल्यामुळे अंबड, धामणगाव आवारी, वाशेरे, तांभोळ यांसारख्या दुष्काळी गावांना यंदा होरपळून टाकणाऱ्या उन्हाळ्यात पाणी पाहायला मिळाले. हे पाणी ओढे, नाले, बंधारे यात सोडले जाते. पाणी जिरल्यामुळे भूगर्भातील पाणी पातळी वाढते. त्याचा लाभ त्या परिसरातील शेतकऱ्यांना होतो. या उपसा योजनेमुळे धरणातील पाण्याची पातळी तलांक ६१४ मी. पर्यंत कमी झाली तरी उच्चस्तरीय पाईप कालव्यातून पाणी सोडणे शक्य होणार आहे. त्यामुळे उच्चस्तरीय कालव्यातून बाराही महिने पाणी पुरवठा करता येणार आहे.

### स्व. मधुकरराव पिचड हेच तालुक्याचे जलनायक

■ पाण्याची पातळी खाली गेलेली असताना ऐन उन्हाळ्यात उचस्तरीय कालव्यातून पाणी दुष्काळी गावांना मिळाले. हे पहाण्यासाठी आज माजी मंत्री, जलनायक मधुकरराव पिचड साहेब हवे होते. खऱ्या अर्थाने त्यांचे स्वप्न आज पूर्ण झाले आहे. तेच खरे तालुक्याचे जलनायक आहेत, अशा भावना लाभधारक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहेत.

SPOT NEWS

## कळसुबाईच्या पायथ्याशी उद्यापासून भव्य डांगी जनावरांचे प्रदर्शन

● **अकोले । वीरभूमी–**

दर वर्षी कळसुबाई यात्रा महोत्सव निमित्त कळसुबाई च्या पायथ्याशी एप्रिल महिन्यात भरवण्यात येत असून देशी – विदेशी जनावरांचे प्रदर्शन २४ ते २६ एप्रिल भरविणेत येणार असल्याची माहिती सरपंच पंढरीनाथ खाडे व ग्रामसेवक माधव धोंगडे यांनी दिली. प्रदर्शन चे हे चौथे वर्ष आहे. बारी–जहागीरदार वाडी येथे दरवर्षी एप्रिल महिन्यात पेसा जहागीरदारवाडी ग्रामपंचायत, पंचायत समिती, आदिवासी विकास विभाग आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डांगी आणि देशी –विदेशी जनावरांचे व कृषी चे प्रदर्शन भरत असते. या प्रदर्शनासाठी अकोले तालुक्याबरोबर इगतपुरी, संगमनेर, जुन्नर, सिन्नर आदी तालुक्यांतून हजारो जनावरे खरेदी विक्री तर काही जनावरे प्रदर्शनासाठी शेतकरी आणत असतात नगर, नाशिक आदी ठिकाणाहून जनावरांच्या खरेदी विक्रीसाठी व्यापारी येथे दाखल होत असतात. सलग ३ दिवस चालणाऱ्या यात्रा महोत्सवात व प्रदर्शनात हजारो नागरिक आपली उपस्थिती लावत असतात विविध व्यावसायिक आपली दुकाने यात मांडत असून या सर्व माध्यमातून या प्रदर्शनात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते.

## विद्यार्थी, पालकांनो आत्ताच दाखले काढून ठेवा : प्रांताधिकारी यादव

● **अकोले । वीरभूमी–**

नुकत्याच दहावी, बारावीच्या परीक्षा संपल्या आहेत. जूनमध्ये पुढील शिक्षणाची पालकांना तयारी करावी लागते. प्रवेशासाठी अनेक प्रकारच्या दाखल्यांची गरज असते. परंतु ऐन निकाल लागल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आताच दाखले काढून ठेवल्यास जूनमध्ये ताटकळत राहण्याची वेळ येणार नाही. एप्रिल पासूनच विविध दाखले काढून ठेवण्याची मानसिकता पालकांनी ठेवावी असे आवाहन प्रांताधिकारी विशाल यादव तहसिलदार डॉ. सिद्धार्थकुमार मोरे यांनी केले आहे. दहावी बारावीची परीक्षा दिलेल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाचे नियोजन आधीच झालेले असते. परंतु त्यासाठी आवश्यक दाखले काढण्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात याची माहिती करून घेण्याचे बहुतांश पालकांचे दुर्लक्ष असते. जूनमध्ये प्रवेश सुरु झाल्यानंतरच दाखले काढण्यासाठी रांगा लागतात. कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी कसरत करावी लागते. दहावी बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी उत्पन्न दाखला, डोमसाईल, नॅशनेलेटी, जातीचा दाखला, नॉन क्रिमिलर लेअर, आरक्षण नसलेल्या जातीसाठी इडब्लूएस प्रमाणपत्र, शेतकरी दाखला, अल्पभूधारक दाखला आदी दाखल्याची गरज असते. त्यासाठी आवश्यक दाखल्याची जुळवाजुळव करण्याची कसरत करावी लागते.

## प्रा.नंदकुमार रासने यांचे निधन

● **अकोले । वीरभूमी–**



अकोले महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे सेवा निवृत्त, प्राध्यापक, कवी, गझलकार प्रा. नंदकुमार मुरलीधर रासने (वय वर्षे ७८) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, दोन भाऊ, तीन बहिणी, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर अकोले येथील अमरधाम मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या विविध विभागतील प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. अकोले कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.रुपाली दीपक जाधव, नाशिक येथील नेटिव्ही ट्रीटच्या संचालिका रश्मी आकाश अंधारे, पुणे येथील नेक्स्ट वेव्हचे संचालक राहुल रासने यांचे ते वडील होत.

## शिव-पाणंद चळवळीमुळे ब्रिटिश कालीन उक्कडगाव -कोंडेगव्हाण रस्त्याचा सात वर्षांचा संघर्ष मिटला



● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

उक्कडगाव ते कोंडेगव्हाण या ब्रिटिश कालीन शिव रस्त्यासाठी गेल्या सात वर्षांपासून झगडणाऱ्या जालिंदर कातोरे यांच्या संघर्षाला अखेर यश लाभले असून १६ एप्रिल रोजी अधिकृत या रस्त्याची शासकीय मोजणी करण्यात आली. हे यश सध्या राज्यभरात सुरू असलेल्या शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीमुळेच शक्य झाले आहे.

हा रस्ता वर्षानुवर्षे अतिक्रमित झाल्यामुळे उक्कडगाव ग्रामस्थांना शेती, शाळा, आरोग्य आणि दळणवळणाच्या मूलभूत गरजांसाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. सन २०१८ पासून जालिंदर कातोरे यांनी तहसील कार्यालयात सातत्याने पाठपुरावा केला. मात्र फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. यामुळे श्री.कातोरे यांनी शिवपाणंद शेत रस्ता चळवळीबद्दल माहिती घेत त्यात सक्रिय सहभाग घेतला आणि श्रीगोंदा तालुका कृती समितीचे सदस्य म्हणून कार्य सुरू केले. यामध्ये राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाने विविध शासकीय कार्यालयांमधील समन्वय अधिक प्रभावीपणे साधला गेला.

शिव-पाणंद रस्ता चळवळीचा राज्यस्तरीय प्रभाव आणि त्यांच्या माध्यमातून श्रीगोंदा तालुक्यातील तहसील, भूमी अभिलेख, पोलीस प्रशासन, पंचायत समिती अशा सर्वच यंत्रणांमध्ये एकजूट साधली गेली. विशेषतः श्रीगोंदा तालुक्यातील तत्कालीन तहसीलदार क्षितिजा वाघमारे यांनी राज्यस्तरीय पहिलं 'शिव रस्ता' परिपत्रक जारी करून रस्ता आंदोलनाला कायदेशीर अधिष्ठान दिलं. भूमी अभिलेख उपअधीक्षक सुहास जाधव व मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी मोजणीचं काम पूर्ण केले. तालुक्यातील सर्व हद्द निश्चिती दरम्यान पोलिसांचे सहकार्य मिळत असल्याने तालुक्यात शेत, शिव-पाणंद रस्ते मुक्त होत आहेत.

## घडाळाच्या दुकानातील चोरीच्या तपासाची चक्रे वेगाने फिरवत, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळा : विवेक कोल्हे

● **कोपरगाव । वीरभूमी–**

शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या सचिन वॉच या प्रतिष्ठित घड्याळ दुकानात दोन दिवसांपूर्वी पहाटेच्या सुमारास मोठी चोरी झाली असून, लाखो रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. या प्रकारामुळे कोपरगावच्या व्यापारजगतात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.या दुर्दैवी घटनेनंतर सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखाना चेअरमन युवानेते विवेक कोल्हे यांनी सचिन वॉचचे मालक संजयशेठ लोहाडे यांच्या दुकानाला आणि निवासस्थानी जाऊन घटनेची संपूर्ण माहिती घेतली. हे प्रकरण अत्यंत गंभीर असून, पोलीस प्रशासनाकडे आरोपींना तातडीने अटक करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. यावेळी संपूर्ण कोपरगावकर व्यापाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी आश्वस्त केले. पहाटेच्या दरम्यान ही चोरी घडली असून, दोन दिवस उलटूनही आरोपींचा ठावठिकाणा लागलेला नाही. यामुळे पोलिसांनी कठोर पद्धतीने तपासाची चक्रे अधिक वेगाने फिरवावी.



मागील काही काळात कोपरगावमध्ये सातत्याने चोरी, अवैध धंदे, हाणामाऱ्या, गोळीबार, जातीय तेढ यांसारख्या गंभीर घटनांचे प्रमाण वाढले आहे. पण यावर अद्याप ठोस कारवाई होत नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. मागील दोन-तीन वर्षांतील अनेक गुन्हे अजूनही उघडकीस आलेले नाहीत त्यावर देखील काम करणे अपेक्षित आहे. कोपरगावची बाजारपेठ फुलवण्यासाठी सर्वच व्यापारी प्रयत्नशील आहेत. मात्र अशा घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीती आणि नैराश्याचे वातावरण निर्माण होत आहे. याचा प्रत्यक्ष फटका संपूर्ण शहराच्या विकासावर होऊ शकतो. सचिन वॉच येथे झालेल्या चोरीप्रकरणी तातडीने आणि प्रभावी कारवाई व्हावी त्यामुळे नागरिकांना कायदा सुव्यवस्थेचा आधार वाढेल.

यावेळी प्रतिक्रिया देताना विवेकभैय्या कोल्हे म्हणाले मा आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी देखील पोलीस अधीक्षक राकेश ओला साहेबांशी चर्चा करून या गुन्ह्यातील आरोपी पकडले जाण्यासाठी विशेष लक्ष घालण्याची चर्चा केली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या मागील कार्यकाळात त्यांनी कोपरगावसाठी दोन स्वतंत्र पोलिस स्टेशन निर्मिती करून दिली आहे. कार्यक्षेत्र मोठे आहे त्यामुळे सध्या पोलिसबळ कमी पडते त्यासाठी अतिरिक्त पोलीस बळ मिळावे यासाठी पत्रव्यवहार देखील कोल्हे ताईंनी केलेला आहे.

स्थानिक पोलिस प्रशासनाने तत्परतेने या गंभीर घटनेकडे लक्ष देऊन, लवकरात लवकर आरोपींना अटक करावी. गुन्हे घडणार नाहीत यासाठी गस्त वाढवावी ही सर्व कोपरगाववासियांची मागणी आहे यावर पोलिसांनी गांभीर्याने कार्यवाही करावी असेही शेवटी कोल्हे म्हणाले. या प्रसंगी श्री संजयशेठ लोहाडे, अतुलशेठ काले, अनिलशेठ कासलीवाल, पप्पूशेठ पडियार, रंजन जाधव, शिखरचंद लोहाडे, अमित लोहाडे यासह लोहाडे कुटुंबीय उपस्थित होते.

# नव्या नियमाप्रमाणे शेख महंमद बाबा ट्रस्टची वक्फ बोर्ड नोंदणी रद्द करावी

## शेख महंमद बाबांचे वंशज अमीन शेख यांचा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रकरण दाखल । श्रीगोंदेकरांच्या सहकार्याने होणार मंदिराचा जिर्णोद्धार

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

हिंदू – मुस्लीम एकतेचे प्रतिक शेख महंमद बाबा देवस्थानचा विकास श्रीगोंदेकरांच्या मनात आहेत तसाच होणार आहे. गेली दोन–तीन दिवसापासून वक्फ बोर्डबाबत जी भिती पसरवण्यात आली होती. त्यासाठी आम्ही वक्फ बोर्डची नोंदणी रद्द करण्यासाठी शेख महंमद बाबा यांचे वंशज म्हणून आमीन शेख यांनी मंगळवार दि.२२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

याबाबत अमीन शेख यांनी सांगितले की, काहींनी श्रीगोंद्यात वक्फ बाबत भितीचे वातावरण तयार करुन आम्हाला व्हिलन करण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्यावर विविध प्रकारचे खोटे आरोप करण्यात आले. आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी केलेल्या सुचनेनुसार वक्फची नोंदणी रद्द करण्याकामी प्रस्ताव दाखल करण्यात आला असुन दि.१६ रोजी आ.पाचपुते यांच्या उपस्थितीत प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शेख महंमद बाबा देवस्थानचा विकास करण्यात येणार आहे.

शेख महंमद बाबांच्या भाविक भक्तांच्या भावनेचा आदर करुन आम्ही हा निर्णय घेतला आहे. शिर्डी सारखे मोठे तिर्थक्षेत्र होण्यासाठी सर्व श्रीगोंदाकरांनी सहकार्य करावे, असे आवाहन आमीन शेख यांनी केले आहे.

> वक्फ बोर्ड सुधारणा कायद्यानंतर सुद्धा भारतात सर्वात प्रथम जमीन माघारी घेणे व नोंदणी रद्द करणे यासाठी अमीन शेख यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे त्यांचे समस्त ग्रामस्थांच्या वतीने आभार व सहर्ष स्वागत. लवकरच ग्रामस्थांच्या सहकार्याने समन्वयाने भव्य दिव्य जीर्णोध्दार झालेला दिसेल.
>
> – **टिळक भोस,** सामाजिक कार्यकर्ते




### या कारणाने वक्फ बोर्डकडे जावे लागले?

■ सन २००८ साली आमच्या कुटुंबाच्या विरोधात खोटे गुन्हे दाखल करुन आमच्या राहत्या घरातील सामान यात्रा कमिटीने बाहेर फेकून दिले, आमच्या लहान मुलांना, महिलांना घरातून हुसकावून लावून जिर्णोधाराच्या नावाखाली देवस्थान ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. यात्रा कमीटीच्या हातून देवस्थान वाचवण्यासाठी आम्ही वक्फ बोर्डाकडे नोंदणी केली. त्या नोंदणीमुळे देवस्थानच्या जागेवर कुणालाही मालकी सांगता येत नाही. त्यासाठी आम्हाला तिकडे नोंदणी करावी लागली. वक्फकडे आम्ही नोंदणी केली असल्याचे त्या वेळेसच यात्रा कमेटीला माहिती होती. जेथे शेख महंमद बाबा यांचे देवस्थान आहे ती सुमारे १० एकर आणि लेंडी नाला, मिशन बंगला पाठीमागे असलेली शेख महंमद बाबा यांची इनामी जागा आहे असे तीन्ही मिळून ३९ एकर जागा आहे. लोकांना आमच्या विरुद्ध भडकावून देण्यासाठी असे सांगण्यात आले की, आम्ही तेली गल्ली, शनिचौक, जोधपूर मारुती चौक, कुंभारगल्ली येथील लोकांच्या जागेवर वक्फ बोर्डाचे नाव लावले ते साफ खोटे आहे.

– **आमीन शेख,** विश्वस्त, शेख महंमद बाबा ट्रस्ट

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नाही यासाठी उपाय योजना करा

## आ. आशुतोष काळे | कोपरगाव तहसील कार्यालयात टंचाई आढावा बैठक

**कोपरगाव | वीरभूमी-**

कोपरगाव मतदार संघात मागील वर्षी चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान झाले असले तरी मतदार संघातील काही गावात नागरीकांच्या व पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. ही टंचाई दूर करून नागरीकांना व जनावरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नाही यासाठी योग्य उपाययोजना करा अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी प्रशासनाला केल्या आहेत.

कोपरगाव तहसील कार्यालयात आ.आशुतोष काळे यांनी टंचाई आढावा बैठक घेवून विविध विभागाचा आढावा घेतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना आ.आशुतोष काळे यांनी सांगितले की, मतदार संघात मागील वर्षी चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान झाल्यामुळे मतदार संघात पाणी टंचाई जाणवणार नाही अशी परिस्थिती होती. परंतु फेब्रुवारी महिन्यापासूनच मोठ्या प्रमाणात उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली असली तरी नागरीकांना पाणी टंचाईची झळ बसू देणार नाही. सातत्याने पाणी टंचाईच्या झळा सोसणाऱ्या जिरायती भागातील जवळके, शहापूर, बहादराबाद, बहादरपूर वगळता बहुतांश गावांमध्ये निळवंडेचे पाणी पोहोचले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाही. पालखेड कालव्याच्या लाभक्षेत्रातील उक्कडगाव, शिरसगाव, तिळवणी, सावळगाव, आपेगाव या गावांना ओव्हरफ्लोचे पाणी मिळाले मात्र त्यानंतर पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी न दिल्यामुळे या गावांमध्ये पाणी टंचाई जाणवत आहे. त्याबाबत जलसंपदा मंत्र्यांकडे पालखेड डाव्या कालव्याच्या अधिकाऱ्यांची तक्रार करणार आहे. त्याचबरोबर पालखेड, एक्स्प्रेस तसेच उजव्या-डाव्या कालव्याच्या पाण्यावर लाभक्षेत्रातील गावांचे आरक्षण मिळण्याबाबतचे प्रस्ताव ग्रामपंचायतींनी तातडीने तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत त्याबाबत पाठपुरावा करू. येत्या काळात निर्माण होणारी पाणी टंचाई दूर करण्यासाठी तातडीने उपाय योजना करा. ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध नाही व टँकर सुरु करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी पंचायत समितीला उपाय योजना करण्याच्या सूचना दिल्या. ज्या गावांनी आपल्या अडचणी मांडल्या त्याबाबत प्रस्ताव द्या जेणेकरून त्या अडचणी लवकरात लवकर सोडविल्या जातील. उष्णता वाढतच चालली आहे त्यामुळे टंचाई जाणवणार नाही अशा अपेक्षा होत्या परंतु आता टंचाई निवारण करण्यासाठी तहसील. पंचायत समिती प्रशासनाने योग्य नियोजन करून प्रभावी उपाय योजना कराव्यात. नागरीकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही याची काळजी घ्यावी अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, नगरपरिषद मुख्याधिकारी सुहास जगताप, नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, गटविकास अधिकारी संदीप दळवी, तालुका आरोग्य अधिकारी



डॉ. विकास घोलप, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अशोक लोहारे, गोदावरी डाव्या कालव्याचे उपविभागीय अभियंता संदीप पाटील, उजव्या तट कालव्याचे उपविभागीय अभियंता संभाजीराव पाटील, वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता धनंजय धांडे, डी. डी. पाटील, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्रद्धा काटे, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनराव काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, विष्णु शिंदे, वाल्मिक कोळपे, राजेंद्र खिलारी, देवचंद कडेकर, महेंद्र काळे, संतोष चवंडके, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबरनाथ चित्रपट महोत्सवात 'श्री गणेशा' सर्वोत्तम

## संजय भोसले | कांचन भोसले ठरले सर्वोत्कृष्ट निर्माते

**श्रीगोंदा | वीरभूमी-**

ठाणे जिल्ह्यातील अंबर भरारी, अखिल भारतीय चित्रपट महामंडळ व डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नववा अंबरनाथ मराठी चित्रपट महोत्सव झाला. या महोत्सवात मढेवडगाव (ता. श्रीगोंदा) येथील भूमिपुत्र व चित्रपट निर्माते संजय भोसले व कांचन भोसले यांच्या नुकताच प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या 'श्री गणेशा' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून गौरविण्यात आले.




या महोत्सवात १२ मानांकने मिळालेल्या 'श्री गणेशा' चित्रपटाने महाराष्ट्र शाहीर, सत्यशोधक व धर्मवीर या चित्रपटांना मागे टाकत चार विभागात सर्वोत्तम म्हणून बाजी मारत चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळवला. यात चित्रपट निर्मिती विभागात संजय भोसले व कांचन संजय भोसले, सर्वोत्तम दिग्दर्शक म्हणून मिलिंद कवडे, सर्वोत्तम अभिनेता म्हणून प्रथमेश परब तर सर्वोत्तम संवाद लेखक म्हणून संजय नवगिरे यांनी पदके पटकावल्यामुळे संपूर्ण महोत्सवात भोसले दांपत्याचा 'श्री गणेशा' चित्रपटाचा दबदबा राहिला.

तर महोत्सवात या वर्षीचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना प्रदान करण्यात आला.तर सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक म्हणून कांचन अधिकारी यांना, तर सर्वोत्कृष्ट लोकप्रिय अभिनेता म्हणून मकरंद अनासपुरे याशिवाय सर्वोत्कृष्ट लक्षवेधी भूमिका 'धर्मवीर दोन' या चित्रपटासाठी मकरंद पाध्ये यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. सिने पत्रकारिता गौरव पुरस्कार मंदार जोशी, कारकीर्द सन्मान पुरस्कार चित्रपट लेखक अनिल कालेलकर, तर तंत्रगौरव पुरस्कार विजय खोचिकर यांना प्रदान करण्यात आले.

या महोत्सवाचे आयोजन महेंद्र पाटील, सुनील चौधरी यांनी केले होते.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मकरंद अनासपुरे, जेस्ट अभिनेत्री सुहास जोशी, विजय पाटकर, संदीप कुलकर्णी. शिवाली परब, प्राजक्ता हनमघर, सुमिता गोंडकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण प्रदान करण्यात आले. या महोत्सवात चित्रपट रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदक अमेय रानडे यांनी सूत्रसंचालन केले. या पुरस्कारामुळे मढेवडगाव व श्रीगोंदा तालुक्यातील सर्व स्तरातून संजय भोसले व कांचन भोसले यांचे अभिनंदन होत आहे.

# नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे बना

## सुनिल रायथाथा | संजीवनी पॉलिटेक्निकमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**कोपरगाव | वीरभूमी-**

आपल्या अवती भोवती असलेल्या ग्राहकांच्या गरजा ओळखा. नाविण्यपुर्ण कल्पनांचा शोध घ्या. स्वयं प्रेरीत व्हा. मेक इन इंडियाचा ध्यास घ्या आणि देशाला पुढे नेण्यासाठी उद्योजक बना. भारतीय इंजिनिअर आव्हाने स्वीकारण्यास सक्षम असतात, म्हणुन नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे बना, असा सल्ला जालना येथिल यशस्वी उद्योजक सुनिल रायथाथा यांनी केले.




संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी केल्याबध्दल त्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. रायथाथा बोलत होते. यावेळी व्यासपीठावर चिफ टेक्निकल ऑफिसर विजय नायडू, रोटरी क्लब कोपरगांव सेंट्रलचे अध्यक्ष राकेश काले, चिफ फायनान्स आफिसर विरेश अग्रवाल, प्राचार्य ए. आर. मिरीकर, सर्व विभाग प्रमुख व डीन उपस्थित होते. या समारंभास विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने हजर होते.

प्रारंभी प्राचार्य मिरीकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून चालु शैक्षणिक वर्षात विद्यार्थी व संस्थेने वेगवेगळ्याा क्षेत्रात राज्य व देश पातळीवर गौरवाचे कोणते कीर्तिमान मिळविले हे सांगीतले. संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था प्रगती करीत असुन महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट पॉलीटेक्निकच्या यादीत या पॉलीटेक्निकचा समावेश असल्याचे सांगीतले.

श्री. रायथाथा पुढे म्हणाले की, जी संसाधने आपल्याकडे आहेत त्यांचा उत्तम उपयोग कसा करता येईल यावर मंथन केले पाहीजे. परमेश्वराने आपणास हात, पाय आणि बुध्दी दिलेली आहे, म्हणुन नाही म्हणायचेच नाही. उद्योग उभारणीसाठी पैसा लागतो, परंतु त्याहीपेक्षा आपल्या उद्योगासंदर्भातील नाविण्यपुर्ण कल्पना महत्वाच्या असतात. पैशापेक्षाही आपल्या कल्पना अधिक मौल्यवान असतात. उद्योगात पुढे जात असताना समस्या येतात. परंतु त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर प्रगती खुंटते, म्हणुन समस्यांना आव्हान म्हणुन स्वीकारून त्यांच्यावर मात करा, आणि यशस्वी उद्योजक बना. प्रत्येक उद्योगात अपयश येतेच, परंतु खचुन न जाता पर्याय शोधत रहा.

श्री नायडू म्हणाले की संजीवनी संस्था ग्रामीण भागात असली तरी व्यवस्थापनाच्या दुरदृष्टीमुळे येथे वर्ल्ड क्लास शिक्षण मिळत आहे. यामुळे हमखास स्वावलंबी होणारी पिढी घडत आहेत.

# महाराष्ट्र प्रवर्तिनी डॉ. ज्ञानप्रभाजी यांचे जीवन त्याग आणि करुणेचे मूर्त रूप होते

## साध्वी सुप्रियादर्शनजी | पाथर्डी येथे आयोजित तीन दिवसीय कार्यक्रमाच्या समारोप

**पाथर्डी | वीरभूमी-**

महाराष्ट्र प्रवर्तिनी डॉ. ज्ञानप्रभाजी यांचे संपूर्ण संयमी जीवन हे विविध गुणविशेषांनी भरलेले होते. त्यांचे आध्यात्मिक, बौद्धिक व श्रमणसंघातील प्रशासनिक व्यक्तित्व हे आकाशासारखे विशाल व विराट होते. त्यांचे मन व स्वभाव निर्मल झऱ्यातील प्रवाहीत पाण्यासारखे निष्कलंक होते. असे प्रतिपादन जैन साध्वी सुप्रियदर्शनाजी यांनी केले.

पाथर्डी येथे जैन साध्वी महाराष्ट्र प्रवर्तिनी डॉ. ज्ञानप्रभाजी महाराजसाहेब यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर जैन साध्वी महासती पुष्पचुलाजी, महासती नियमदर्शनाजी, महासती अंशुश्रीजी, महासती प्रियलदर्शनाजी उपस्थित होत्या.

पाथर्डी जैन श्रावक संघाच्या मार्गदर्शना खाली आयोजीत या श्रद्धा व भक्तीमय कार्यक्रमासाठी जळगाव, नाशिक, पुना, घोडनदी, मालेगाव, वैजापूर, चाळीसगाव, अ.नगर, नाशिराबादसह राज्यातील विविध ठिकाणचा भक्त परिवार उपस्थित होता. यावेळी पुढे बोलताना अत्यंत भावुक होत सुप्रियदर्शनाजी यांनी महासतीजीच्या अंतिम जिवन प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या की, मधुरभाषिता, नेतृत्व क्षमता, विवेकशीलता हे सहजगुण त्यांच्या अंगी होते. त्यामुळे त्यांनी आपल्यावरील सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. त्यांची आचार निष्ठा, आगम निष्ठा, मर्यादा निष्ठा, सिद्धांत निष्ठा व आत्म मनोबल अतुलनीय होते. त्यांच्या अंगी असलेल्या अनेक गुणांच्या संगमामुळे त्यांना विविध उपाध्यांनी सन्मानित करण्यात आले. साध्वी उज्वलकंवरजी व आचार्य आनंदऋषीजी यांचे अनंत उपकार व मोठा विस्वास साध्वीजींवर होता. अनेक शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील पदव्या मिळवून ही त्या अतिशय नम्रपणे हे सर्व श्रेय गुरुकृपेला देत असत. इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती, राजस्थानी सह विविध भाषांवर त्यांचा प्रभाव होता. जैन दर्शन, आगमातील जीव तत्त्व यांचा सखोल अभ्यास करत त्यांनी डॉक्टरेट पदवी मिळवली. आपल्या दायित्वाप्रती त्या नेहमी जागृत असत. आराधना, साधना, मानव कल्याणासाठी त्यांनी अनेकांना मार्गदर्शन करत अनेक उपक्रमांची पायाभरणी केली. अनेक संस्थांना त्यांनी सहकार्य केले. त्यांनी संपूर्ण भारतभर पायी प्रवास करत विविध ठिकाणी चातुर्मास करत जैन धर्माची प्रभावना केली. असे गौरवोद्गार त्यांच्या अंत्येवासी शिष्या सुप्रियदर्शनाजी यांनी आपल्या गुरुणीसांची महती सांगताना काढले. उपस्थित सर्व साध्वीजींनी महासतीजीच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी साध्वीजींच्या अंतिम जीवनावर आधारित सुंदर अशी नाटिका बहु मंडळांनी सादर करून उपस्थितांच्या मनाला भावनिक साद घातली. या तीन दिवसीय कार्यक्रमात भक्तांमर जाप सह



विवीध धार्मिक उपक्रम पार पडले. यावेळी महासतीजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दानवीर आनंदकुमार श्रेयंसकुमार चोरडिया परिवाराच्या वतीने श्री श्रावक संघास धार्मिक उपक्रमासाठी सुमारे एक कोटी रुपये किमतीची जागा दान देण्यात आली. यावेळी श्रावक संघाच्या वतीने चोरडिया परिवाराचा सन्मान करण्यात आला. तर राज्यभरातील विविध भक्तगणांनी या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या उपक्रमासाठी लाखो रुपयांच्या देणग्या जाहीर केल्या. यावेळी विविध ठिकाणच्या भक्तांनी आपल्या वाणीतून साध्वीजींना श्रद्धासुमन अर्पित करत आपल्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी निलेश बोरा, सुनील गांधी, आनंद चोरडिया, अल्पेश भंडारी, सचिन भंडारी, अनिल खाटेर, सतिश गुगळे, विजय लुनावत, राजेंद्र गुगळे, सुनिल गुगळे, महेंद्र गुगळे, राजेंद्र भंडारी, चंदन कुचेरिया, अभय गांधी, मुकुंद सुराणा, धिरज गुंदेचा यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष सुभाष चोरडिया यांनी केले. सुत्रसंचलन सचिव सुरेश गुगळे यांनी केले तर निलेश खाबिया यांनी आभार मानले.